Vol 3 Issue 10 Nov 2013

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-10, Nov-2013
ISSN 2230-7850

Available online at www.isrj.net

# मराठी ग्रामीण कथा : प्रेरणा आणि स्वरूप

**महादेव अंकुश गायकवाड**
मु.पो. भांडगाव, ता. इंदापूर जि. पुणे

***सारांश*** :समाजातील घटना घडामोडीचे प्रतिबिंब साहित्यात पडते, त्यामुळेच वाड्.मय आणि वाड्.मयीन चळवळी यांचा अतिशय जवळचा संबंध असतो. प्राचीन काळात लिंगायत, महनुभव आणि वारकरी अशा धार्मिक व वाड्.मयीन चळवळ निर्माण झाल्याचे दिसून येते. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक इत्यादी वेगवेगळया कारणामुळे हया चळवळी निर्माण झाल्याचे दिसून येते. या चळवळी धार्मिक, सामाजिक आणि वाड्.मयीन अशा त्रिविध परिणामांची बाज राखणा–या होत्या. असे परिमाण आधुनिक काळात प्रामुख्याने ग्रामीण आणि दलित साहित्य चळवळीला प्राप्त झाल्याचे दिसते. सामान्य माणसाच्या जीवनातील संघर्ष साहित्यात प्रतिबिंबीत झाल्याचे दिसून येतात. जीवन–परिवर्तनासाठी साहित्य चळवळी सतत प्रयत्नशील असतात. त्यामुळेच वेगवेगळया जनसमूहासाठी, वेगवेगळया भौगोलिक समस्यासाठी विविध साहित्य चळवळी निर्माण झाल्याच्या दिसून येतात.

***प्रस्तावना :***

मराठी ग्रामीण जीवन जाणिवा कथेच्या माध्यमातून 1925 च्या आसपास शब्दबध्द होऊ लागल्या. महात्मा फुले यांच्या साहित्यात ग्रामीण जीवन जाणिवांचा खरा, आविश्कार पहावयास मिळतो. 'शेतक–याचा आसूड', 'तृतीय रत्न नाटक', 'अखंड' असे महत्वपूर्ण ग्रंथ लिहून त्यांनी ग्रामीण साहित्याला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. वैचारिक अधिश्ठान असल्याशिवाय कोणतीही साहित्य चळवळ जनसामान्यांत रूळू शकत नाही, हे जरी खरे असले तरी महात्मा फुले यांचे विचार ग्रामीण कथेच्याद्वारे यायला 1960 पर्यंत वाट पाहावी लागली. वासुदेव मुलाटे, भास्कर चंदनशिव यांच्या कथेवर महात्मा फुले यांचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. साहित्यात ग्रामीण जीवनाचे चित्रण प्रथम महात्मा फुले यांनी केल्याचे दिसते.

दु:ख, दैन्य, दारिद्रय, शोषण वगैरे सामाजिक प्रश्न साहित्याच्याद्वारे मांडणे हीच मराठी ग्रामीण कथेची प्रेरणा आहे.डॉ. द. ता. भोसले ग्रामीण साहित्याच्या व्याख्येतून पुढील बाबींवर जोर देतात. ते लिहीतात – “ आजच्या ग्रामीण साहित्यात भूक, दारिद्रय, अज्ञान, शोषण आणि उपेक्षा या गोष्टीतून उद्ध्वस्त झालेल्या जीवनाचे चित्रण येते. या प्रेरक घटनांचा संदर्भ वेगळा असेल. भूक किंवा दारिद्रयाचे स्वरूप भिन्न असेल, त्याची तीव्रता कमी–अधिक असेल पण शेवटी त्या भवना म्हणून तशा एकच म्हणाव्या लागतील. या पाच बाबींचे चित्रण म्हणजे ग्रामीण साहित्य म्हणावे लागेल. ” ग्रामीण साहित्याच्या संदर्भात द. ता. भोसले यांना ज्या गोष्टी जाणवतात, त्या त्यांनी ग्रामीण साहित्याच्या व्याख्येतून मांडलेल्या दिसतात. दलित साहित्यातून येणारा विद्रोह, बंडखोरी आणि नवसमाज निर्माण करण्याचा ध्यास याबाबी त्यांच्या व्याख्येत येत नाहीत. त्यामुळेच त्यांच्या ग्रामीण साहित्याच्या व्याख्येबाबत काही मर्यादा स्पष्ट होतात.

ग्रामीण जीवन आणि ग्रामीण वास्तव जर ग्रामीण लेखनात नसेल तर त्याला ग्रामीण साहित्य म्हणणे उचित ठरणार नाही. ग्रामीण साहित्याची व्याख्या डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी पुढील प्रमाणे केलेली आहे. ते म्हणतात – “ ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य.” [2] या व्याख्येमध्ये ग्रामीण जीवन आणि ग्रामीण वास्तव यांना विशेष महत्व दिले आहे. त्यामुळेच ग्रामीण साहित्यात खेडेगांव, येथील माणूस, त्याची जीवनपद्धती, अंतर्गत ताणतणाव, शेती, निसर्ग इत्यादी समग्र बाबींचा समावेश होतो.

***मराठी ग्रामीण कथेच्या प्रेरणा :–***

1 मे 1960 रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. शिक्षणाची गंगा वाडी–वस्ती पर्यंत जाऊन पोहचली. नवीन शिक्षितांची संख्या वाढू लागली. शिकलेली पिढी वाचू लागली. लिहू लागली. विविध वाड्.मय प्रवाह जोम धरू लागले. खेडयांमध्ये आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, कृषिविषयक आणि ज्ञानात्मक असा जो विविध क्षेत्रात झपाटयाने विकास झाला. त्यातून साहित्यानिर्मिती होऊ लागली. ग्रामीण भागातील बदलाचे स्वरूप ही मराठी ग्रामीण कथेची प्रेरणा होय.

ग्रामीण कथेची निर्मिती ही बदलत्या ग्रामीण जीवनाचे वेगवेगळया लेखकांनी केलेले मंथन आहे. बदलती खेडी, जागतिकरणचे खेडयावर होणारे परिणाम, खेडयातील समाज व या समाज जीवनात होणारे बदल याचे चित्रण मराठी ग्रामीण कथाकारांनी अतिशय खुबीने केले आहेत. या साहित्यातून घडणारे 'देशीपणाचे' चे दर्शन आहे. हे ही मराठी ग्रामीण कथेची प्रेरणा आहे.

आपण ज्या गावात जन्मलो, ज्या मातीत वाढलो, ज्या मातीचे आपल्यावर संस्कार झाले. त्या गावाबद्दल त्या मातीबद्दल लिहिण्याची इच्छा मनात निर्माण होणे. तशी कृती घडणे हे स्वाभाविक आहे. या संदर्भात मोहन पाटील लिहीतात – “ गावाच्या मातीचे संस्कार, तिथले प्रामाणिक अनुभव आणि पिंडधर्माने माती आणि माणसं या विशयी वाटणारा जिव्हाला, गावाची राहाटी, तिथली समूहजीवन आणि समूह जीवनातून वाहाणारा एक अंतर्नाद, ग्रामीण साहित्यामध्ये उमटलेला असतो. ग्रामजीवन हा एक भारतीय जीवनाचा समांतर प्रवाह आहे. या प्रवाहातले अनमोल जीवित स्वानुभवातून सढळपणे आविश्कृत करता आले तर ते शब्दातून सांगण्याचीच उबळ आली तर तीच ग्रामीण साहित्याची प्रेरणा ठरेल.” [3] 'गाव ' आणि तेथील 'संस्कार' हे ही ग्रामीण कथा लेखनामागची प्रेरणा ठरतात.

आपल्या आवडीच्या नागर लेखकांच्या साहित्यांचे अनुकरण करणे हे ही ग्रामीण कथा लेखकांच्या लेखनामागची प्रेरणा ठरते. या संदर्भात राजीव यशवंते असे लिहीतात – “ ग्रामीण लेखकांच्या प्रेरणा या शहरी मराठी लेखक व त्यांचे साहित्य समोर ठेवणा–या होत्या. ” [4] ग्रामीण साहित्याचे लेखन करणारे मध्यमवर्गीय पांढरपेशी असल्याने साहजिकच या लेखकांनी शहरी लेखकांना समोर ठेवून अनेक कथांची निर्मिती केल्याचे दिसून येते. एकंदरीत ग्रामीण जीवनात जे जे दिसते, जे जे असते य ते सच्चेपणाने साहित्यातून मांडणे हीच मराठी ग्रामीण कथेची प्रेरणा आहे.

***मराठी ग्रामीण कथेचे स्वरूप :–***

1925 च्या नंतर मराठीमध्ये ग्रामीण प्रादेशिक साहित्याची निर्मिती अधिक जोमाने होऊ लागली असे दिसते. प्राचीन काळातील, मध्ययुगीनकाळातील साहित्यातूनही ग्रामीणतेच्या खाणाखुणा आढळतात. पण त्यात सलगता आणि समृध्दता दिसत नाही. तरीपण ब–याच ठिकाणी ग्रामीण जीवन, ग्रामीण वास्तव प्रकट झाले आहे. प्राचीन काळाच्या अगोदरही लोककथांमधून, ग्रामीण जीवनदर्शन घडते. त्यानंतर 'लीळा चरित्र', 'दृष्टान्तपाठ' मधूनही ग्रामीण जीवन येते. संतपंत साहित्यातूनही ग्रामीण साहित्याच्या खुणा सापडतात. लावणी वाड्.मय बखर वाड्.मय यातही ओझरते कां होईना ग्रामीणतेचे वर्णन आढळून येते.

एकोणीसाव्या शतकाच्या अखेरच्या काळात हरिभाऊ आपटे, सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई, मुकुंदराव पाटील यांनी मराठी ग्रामीण कथेची सुरूवात केल्याचे दिसते. त्यानंतर र. वा. दिघे, ग.ल. ठोकळ, चि.य. मराठे, म. भा. भोसले यांनी ग्रामीण जीवनपध्दतीवर कथालेखन केल्याचे दिसते. कल्पनेच्या पातळीवर कथालेखन या मंडळीनी केले आहे. त्यांच्या लिखानात वास्तवता दिसून येत नाही. तरीपण त्यांच्या कथेने मराठी वाचकांची अभिरूची वाढविली आहे, हे निश्चितच खरे आहे.

मराठी ग्रामीण कथा वास्तववादी करण्याचे कार्य श्री.म. माटे यांनी केले आहे. दलित जीवनाचे चित्रण अतिशय वास्तवादी त्यांनी मांडले आहे. तयांच्या कथेचा विषय दलित, पीडित लोकांचे, जीवन हाच, झाल्याचा दिसतो. 'कातकरी', 'मांग', 'रामोशी', 'कोळी' अशा अनेक उपेक्षित लोकांचे जीवन माटे यांनी रेखाटले

आहे.

व्यंकटेश माडगूळकरांनी 'माणदेशी माणसं', 'वारी', 'गावाकडच्या गोश्टी', 'हस्ताचा पाऊस', 'उंबरठा' इ. कथासंग्रह लिहिलेले आहेत. माणदेशी माणसाचे दुःख, दैन्य, दारिद्रय त्यांनी अतिशय जिवंतपणाने रेखाटले आहे. जणु काही ही भोळीभाबडी, लबाड, चतुर माणसं वाचकांशी संवाद साधत आहेत. इतका जिवंतपणा त्यांच्या कथा वाचतांना अनुभव येतो. स्वतः लेखकाने जे अनुभवले, पाहिले, जे जगले तेच त्यांच्या बोलीभाशेत प्रकट केले आहे. त्यात कोठेही भडकपणा नाही, की ओढून ताणून जुळवाजुळव नाही. जे आहे ते जसेच्या तसे त्यांनी आपल्या कथेद्वारे मांडले आहे. माणदेशी मानवी मनाचा वेध घेणारी त्यांची कथा वास्तव आणि कलात्मकदृश्टया दर्जेदार ठरली आहे.

शंकर पाटील यांनी खेडयातील माणसांची दुःखे त्यांनी बोलकी केली आहेत. त्यांच्या कथा विनोदी व गंभीर अशा दोन्ही प्रकारच्या आहेत. स्त्री शोषण त्यांनी आपल्या कथाद्वारे प्रभावी मांडले आहे. 1945 नंतर द. मा. मिरासदार यांनी कथालेखन केले आहे. धूर्त, कावेबाज, इरसाल माणसे मिरासदारांनी आपल्या कथेतून उभी केली आहेत. याचकाळात अण्णा भाऊ साठे यांनी 'खुळंवाडी', 'फरारी', 'गजाआड', 'कृष्णाकाठच्या कथा' असे अनेक कथासंग्रह लिहिलेले आहेत. गावकुसाबाहेरच्या उपेक्षित अज्ञानी वर्ग अण्णा भाऊंच्या कथेचा विषय झाला आहे. अण्णांच्या कथेतील माणसं स्वाभिमानी, सामर्थ्यवान, कष्टाळु आदर्श जीवनमूल्ये जपणारी आहेत. गावकुसाबाहेरच्या दलित, भटक्या जीवनावरही शंकरराव खरात यांनी कथालेखन केले आहे. त्यांच्या – 'बारा बलुतेदार', 'दवंडी', 'सांगावा', 'तडीपार' अशा कथा दलित, भटक्या जमातीवर प्रकाश टाकतात. डोंबारी, माकडवाले, वैदू अशा भटक्या जमातीच्या चालीरिती, रूढी, परंपरा, त्यांच्या इच्छा आकांक्षावर त्यांनी प्रकाश टाकला आहे.

1960 च्या आसपास रा. रं. बोराडे, मधु मंगेश कर्णिक, महादेव मोरे, चंद्रकुमार नलगे, प्रा. व. बा. बोधे, चारूता सागर, डॉ. द.ता. भोसले इत्यादींनी कथालेखन करून मराठी कथेचा प्रांत समृध्द केला आहे. डॉ. द. ता. भोसले यांनी विनोदी व गंभीर असे दोन्ही प्रकारचे लेखन केले आहे. शेतकरी, शेतमजूर, खेडयातील राजकारण वगैरे विशय त्यांच्या कथेचे आहेत. वारंवार पडणा–या दुश्काळाने गावकुसातील व गावकुसाबाहेरचे जीवन कोलमडते, अल्प–भूधारक शेतकरी, शेतमजूर, त्यांच्या कुटूंबातील राबणारी स्त्री यांचे चित्रण भोसले समर्थपणे करतात. बदलत्या क्षेडयांचे वास्तव आणि कलात्मक चित्रण त्यांनी केले आहे.

शेती आणि ग्रामीण साहित्य यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. त्यामुळेच मराठी ग्रामीण कथेच्या केंद्रस्थानी कृषिकेंद्रित ग्रामीण समाज आहे. पावसाच्या लहरीवर शेती उद्योग अवलंबुन आहे. दुष्काळ, पूर, नापिकी इत्यादी नैसर्गिक संकटे शेतीवर सतत आघात करतात. त्यामुळे या संकटाचे लोण मराठी ग्रामीण कथेत दिसून येते. हे संकट पेलण्याची मानसिकता ग्रामीण समाजाला आता जन्मजात अवगत होऊ लागली आहे. याबरोबरच काही मानव–निर्मित संकटे शेतकरी व शेती यांना घेरू लागत आहेत. ही मानवनिर्मित संकटे आधुनिक काळात जोर धरू लागली आहेत. सहकारातील भष्ट्राचार, यंत्रयुगामुळे वाढणारी बेकारी, वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणारे विविध प्रश्न, पर्यावरणाची हानी आणि त्यातून उद्भवणा–या विविध समस्या यामुळे ग्रामीण जीवन ढवळत आहे. लोकशाहीतील निवडणूकामुळे विविध प्रश्न ग्रामीण जीवनामध्ये निर्माण होत आहेत. इंग्रजांचं राज्य बरं व्होतं अशी भावना ग्रामीण माणसाच्या तोंडी कधी कधी पडत आहे. परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. याला मराठी ग्रामीण कथा ही अपवाद नाही. यासंदर्भात डॉ. वासुदेव मुलाटे लिहितात – " ग्रामीण साहित्य परिवर्तनाचे अपत्य आहे. एकूण मराठी साहित्यातून येत असलेल्या परिवर्तनातून ग्रामीण साहित्याची संकल्पना पुढे आली."[5] शेती उद्योग हा ग्रामीण भागाचा आर्थिक कणा आहे. जागतिकीकरणामुळे शेती उद्योगात परिवर्तन होत आहे. या परिणामाचे मूलगामी परिवर्तन ग्रामीण भागात घडत आहे.

आज ग्रामीण समाजाचे केवळ शोषणकर्ते बदलले आहेत य शोषण मात्र कायम आहे. प्राचीन काळ, मध्ययुगीन काळ यामध्ये असलेला शोषकवर्ग आजच्या इतका प्रबळ नव्हता. पण आज लोकशाहीत निर्माण झालेला, ग्रामीण समाजाचाच घटक असलेला शासकीय अधिकारी आणि पुढारी शोषकवर्ग म्हणून नावारूपाला येत आहे.

ग्रामीण साहित्याचा विचार करीत असतांना बहुजन समाजाला डोळयांपुढे ठेवून चित्रण केले तरच ते ख–या अर्थाने ग्रामीण साहित्य होवू शकले, नाहीतर मूठभर लोकांचेच विचार मांडणे, त्यांचाच गुणगौरव करणे म्हणजे ग्रामीण साहित्य होवू शकत नाही. या संदर्भात डॉ. वासुदेव मुलाटे लिहीतात – शबहुसंख्याकांना गौण ठरवून मूठभरांना गौरविणे, त्यांचाच विचार मांडणे, सांगणे मराठी साहित्यात दीर्घकाळ घडत आले. ज्या ग्रामीण माणसाच्या घामातून, कश्टातून धान्य पिकले, त्या धान्याच्या अन्नावर पोसलेल्या मूठभरांनी त्या कष्टाळू, श्रमजीवी माणसांच्या आयुश्यालाच गौण लेखले, हीन ठरवले. एवढंच नाही तर या मूठभरांच्या वृत्तीविरूध्द आवाज उठवणा–या महात्मा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, श्री. म. माटे यांना छळले, हीन लेखले. त्यांच्या कार्याची, साहित्याची टिंगल केली. स्वातंन्त्र्योत्तर काळात, शिक्षणाने डोळस बनलेल्या ग्रामीण संवेदनशील लेखक मनाला हे न रूचणे साहजिकच होते. ग्रामीण माणूस आणि ग्रामीण साहित्य हा टिंगलटवाळीचा हेटाळणीचा विनोदाचा विषय नाही हे ठामपणे सांगण्याची गरज होती. "[6] यामुळेच ग्रामीण साहित्य चळवळ ही सर्व समावेशक आहे.

भौतिकदृष्टीने ग्रामीण समाज बदलला आहे. काळानुरूप बदलत आहे. पण त्याबरोबर वेगवेगळया समस्या निर्माण होत आहेत. लोकांची मानसिकता बदलत आहे. राजकारणात धर्म, जात, पैसा यांना महत्व वाढत आहे. सहकार चळवळीने ग्रामीण भागात श्रीमंती वाढत आहे., पण माणुसकी अटत चालली आहे. शेतीच्या अर्थ कारणार जागतीकीकरणाचा प्रभाव पडत आहे. शेतीच्या मालाच्या बाजारभावाचा प्रश्न, धरणग्रस्तांच्या अडचणी, सुशिक्षित बेकारांची वाढती संख्या, वाढती व्यसनांधता वगैरे प्रश्न आजच्या ग्रामीण माणसासमोर आ वासून उभे आहेत. हे सर्व मराठी ग्रामीण कथेच्या माध्यमातून वाचकांसमोर येत आहे.

1975 च्या नंतर प्रा. भाश्कर चंदनशिव यांनी खेडयातील बदल आणि विविध प्रश्न आपल्या मराठी कथेद्वारे त्यांनी मांडले आहेत. 'मरणकळा', 'जांभुळढव्ह','अंगारमाती', 'नवी वारूळे' अशा कथासंग्रहांतून त्यांनी विविध प्रश्नांचा मागोवा घेतला आहे. बीड, उस्मानाबादच्या परिसरात चंदनशिवांची कथा रममान होते. शेतकरी केंद्रस्थानी ठेवूनच त्यांनी कथा लिहीली आहे. महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या कथेवर दिसतो. त्यांची कथा शेतीव्यवसायातील अपयशाची कारणमीमांसा करते, त्याचबरोबर गावकुसाबाहेरचे नवे बदल, राजकारण, त्यातील नवे प्रश्न यांचा ऊहापोह त्यांची कथा समर्थपणे करतांना दिसते. दिवसेंदिवस विज्ञानाचा प्रचार आणि प्रसार वाढत आहे. नव्या बदलाने खेडयात अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. पाणी वाटप नियोजनाचा अभाव, वारंवार पडणारे दुष्काळ, शेती व्यवसायात होणारे चढउतार, शेतक–यांच्या आत्महत्या बेकार युवापिढी, भूक, दारिद्रय, उपासमार दुःख इत्यादी ग्रामीण माणसांच्या मनात खदखदत आहे. हे सर्व मराठी ग्रामीण कथेत येणे गरजेचे आहे.

***संदर्भ ग्रंथ :–***

1.द. ता. भोसले 'ग्रामीण साहित्यः एक चिंतन', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ. 111

2.नागनाथ कोत्तापल्ले, श्ग्रामीण आणि प्रादेशिक : स्वरूप विचार', 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पृ. 8 तृतीयावृत्ती 2007.

3.मोहन पाटील, 'ग्रामीण साहित्याची प्रेरणा', 'ग्रामीण साहित्य आणि संस्कृती', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद पृ. 85. दुसरी सुधारित आवृत्ती 2008.

4.राजीव यशवंते, 'ग्रामीण साहित्य : संकल्पना व चळवळपूर्व पार्श्वभूमी', 'ग्रामीण साहित्य चळवळ : प्रेरणा व स्वरूप ', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पृ. 50, प्रथमावृत्ती 2010.

5.संपादक– डॉ. कृष्णा इंगोले, मूळ लेखक – डॉ. वासुदेव मुलाटे – ग्रामीण साहित्य आणि वास्तव ख्डॉ. द. ता. भोसले गौरव ग्रंथ , पान नं. 42, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती 26 जानेवारी 2011.

6.संपादक, डॉ. कृष्णा इंगोले, मूळ लेखक– डॉ. वासुदेव मुलाटे – ग्रामीण साहित्य आणि वास्तव ख्डॉ. द. ता. भोसले गौरव ग्रंथ , स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. पान नं. 59 प्रथमावृत्ती 26 जानेवारी 2011.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net